Comments 2025

अभिजात मराठीतले सखोल चिंतन !

( स्वप्नील चव्हाणच्या पोस्टवर )

अप्रतिहत

वाह्यात शब्दांना आवर घालता येईना
म्हणून सर्व गाड्या रद्द केल्या
त्या गाड्यांनी जाणार होतो मीच
पण माझ्या मिश्यांची जन्मशताब्दी
साजरी करण्यासाठी
मला थांबावे लागले
अप्रतिहत म्हणजे काय
हे मला ठाऊक नव्हते
खरे तर आजही नाही
तरीही देवापुढे नेमाने दिवा लावावा
तशी पाणीकपात चालू ठेवली
जनता निर्लज्ज असते
आपल्या दुःखांचे भांडवल करून
ती सर्व संस्कृतीनाशाचे
समर्थन करते
कोणत्याही कारणाने सिग्नलव्यवस्था
कोलमडता कामा नये हे सांगूनही
खरेदीला निघून जाणारे महाभाग
असलेल्या या देशात
सौख्य कुठले नांदणार
बेरोजगारीची समस्या एकदा सुटली
की सगळ्या गाड्या वेळेवर सुटतील
या आशेवर चालू राहते माझे मिश्या
वाढवणे आणि त्यांना पीळ देणे

चंप्रंच्या ‘खुल जा सिम सिम’ या कवितासंग्रहामधील ही कविता. ही कविता दोन-तीनदा वाचली की लगेच ध्यानात येते की या कवितेचा अर्थ लावणे शक्य नाही. अर्थासाठी कविता वाचणारे वाचक पैश्यांच्या मोबदल्यात सामान मोजून घेणाऱ्या गिऱ्हाईकांसारखे असतात. “आम्ही वाचण्याचे कष्ट घेतले, अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचले त्यामुळे आम्हाला कळायलाच हवे,की या कवितेत काय म्हटले आहे”अशी त्यांची 'रास्त' अपेक्षा असते. या कवीचा हेतू काय आहे? हा कवी

आपल्याला काय संदेश देत आहे? किंवा काय दृष्टिकोन देत आहे? समाजाच्या कुठल्या समस्येवरती हे भाष्य आहे?हे कळले की त्यांचा जीव भांड्यात पडतो.

एकदा कवीचे भाष्य, संदेश कवितेचा अर्थ कळला की ह्या प्रकारचा वाचक, तो अर्थ तर्कसुसंगत आहे का, आणि योग्य व सत्य आहे का, हे देखील तपासून बघतो. ही पडताळणी त्याला अगोदरच ठाऊक असलेल्या ज्ञानाच्या आधाराने होते. त्या त्याच्या ज्ञानाशी, माहीत असलेल्या दृष्टिकोनाशी कविता जर सुसंगत असली तर ती त्याला भावते. थोडक्यात त्याला आधीच काय ते सत्य ठाऊक असते. त्याचा दृष्टिकोन कविता वाचण्यापूर्वीपासूनच योग्य असतो आणि कविता केवळ त्या दृष्टिकोनाला व ज्ञानाला दुजोरा देण्याचे काम करते. त्याचा काव्या अनुभव दांभिक व उपाहासवृत्तीने (cynical) होतो.

आपला नवसाक्षरांचा समाज आहे. या समाजात लिहिणे वाचणे एक तर प्रॅग्मॅटिक कारणांसाठी होते किंवा भाषेला पवित्रतेचे वलय तरी असते. एका बाजूला ज्ञान माहिती संदेशाचे वहन करणारी भाषा तर दुसऱ्या बाजूला आध्यात्मिक किंवा राजकीय मुक्तीकडे नेणारी भाषा हे दोनच भाषेचे व्यवहार महत्त्वाचे समजले जातात. मघाशी कवितेच्या अर्थनिर्णयनांमधील दांभिकपण मी वर्णन केले. आधीच परिचित असलेला अर्थ नवनव्या कलाकृतींमध्ये पुन्हा पुन्हा पाहीला जातो.इतर भाषेच्या वापरात देखील या प्रकारची उपहास वृत्ती दिसत असते. सगळेच सगळ्यांना ठाऊक असते. म्हणून कोणालाच कशाचे आश्चर्य वाटत नाही. आपला नेता किंवा राजकीय पक्ष खोटं बोलत आहे हे सहज समजून घेतले जाते. जर्मन विचारवंत पीटर स्लॉटरडाईकने या सिनिकल रीझन असे म्हटले आहे. साहित्यातील किंवा राजकारणातील हा दांभिकपणा एक्सपोज केल्याने काही होत नाही, कारण त्या दांभिकपणामध्ये जाणीवपूर्वक सगळेच सहभागी असतात. विद्यमान हिंदुत्ववादी सत्ताधारी असत्या मागून असत्य बोलत असतात हे सगळ्यांनाच माहीत आहे वेगवेगळ्या प्रकारचे सांख्यिकी अहवाल बदलण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. आता याला उपाय म्हणजे सत्य सांगून लोकांचे डोळे उघडणे असे कोणाला वाटू शकते. मात्र या
सत्योत्तर काळात लोकांचाही या खोट्या आयडिओलॉजीमध्ये सहभाग असतो. या परिस्थितीत सत्याचे स्थानदेखील केवळ अनेक कथनांपैकी एक कथन, अनेक संभाषितांपैकी एक संभाषित असे बनते. सत्याची अधिकृतता नष्ट होते. याचे अ-वास्तव, का त्याचे अ-वास्तव स्विकारायचे एवढेच वादाचे स्वरूप बनते. आपण हे नीट पाहिले असले, तर हिंदुत्ववादी विचारवंतांमध्ये नॅरेटिव किंवा कथन आणि डिस्कोर्स किंवा संभाषिते हे दोन सोफिस्टिकेटेड सैद्धांतिक शब्द लाडके झालेले दिसतात. कारण सत्य म्हणून काही एक नसते असा त्यांचा सोयीचा आणि गाढ विश्वास आहे.

अशी परिस्थिती आधुनिक कवितेला उत्साहदायक वाटायला हवी कारण सत्य व वास्तवाची सापेक्षता, भाषेची निरर्थकता या कवितेने नेहमीच अधोरेखित केली आहे. अस्मितेच्या सर्वच कथनांमध्ये किंवा संभाषितांमध्ये सत्य हे फारसे महत्त्वाचे नसते इतिहास म्हणजे भूतकाळाचे वास्तव दर्शन नसते तर आपापल्या आयडिओलॉजीनुसार असलेली विविध, एकमेकांना पर्यायी अशी कथने असतात. त्यामुळे कधी रामदास स्वामी आणि शिवाजी महाराज यांच्या संबंधांबद्दल विवाद होतात तर कधी सावित्रीबाई फुले आणि फातिमा बी यांच्या संबंधांबद्दल. सत्य हे मूल्य धोक्यात आलेल्या काळात आधुनिक किंवा उत्तर आधुनिक कवीता या निरंकुश कथनांच्या धोकादायकरित्या जवळ येते.

तरीही कवितेतील अ वास्तव किंवा निरर्थकता ही वेगळी आहे. या कवितेच्या संदर्भात ती कशी वेगळी आहे हे आपल्याला आता बघायचे आहे. 'अप्रतिहत' या कवितेची पहिलीच ओळ कवितेचे गुपित उलगडते.

" वाह्यात शब्दांना आवर घालता येत नाही" शब्दांना स्वतःचे भौतिक अस्तित्व आहे. शब्द केवळ अर्थवहनाची साधने नाहीत. साहित्य या कलाक्षेत्रात भाषेला संवादापासून, संदेश वहनापासून स्वातंत्र्य मिळते. सद्यकालीन सिनीसिझममधून भाषावापराची

निर्देशनापासून झालेली मुक्तता आणि कवितेतील शब्दांच्या पार्थिवतेचा उत्सव यामध्ये फरक आहे. (सिनिकल रिजनला) कुत्सित विवेकाला सत्य आणि असत्य यामधील फरक चांगलाच माहीत असतो. आणि तो फरक माहीत असून देखील सत्योत्तर राजकारणी, सामाजिक विचारवंत रेटून खोटे बोलत असतात.

बाबरी मशिदीच्या जागी राम जन्मभूमीच्या खुणा पुरातत्वज्ञांना सापडल्या नाहीत. त्या सापडणार नव्हत्याच. हे नवहिंदुत्ववाद्यांना चांगलेच माहीत होते. ते तसे सिद्ध झाल्यानंतरदेखील न्यायपालिकेने केवळ लोकभावनांचा, आक्रोशाचा आदर करून ती जागा हिंदुत्ववाद्यांना बहाल केली. यात सत्य व न्यायाचा बळी गेला. गेल्या दहा वर्षात भारताचा विकास होत नाही आहे दारिद्र्य दैना वंचना वाढत आहे. भारत महाशक्ती होण्याऐवजी सर्वात दरिद्री देशांच्या पंक्तीत बसत आहे. हे देखील सगळ्यांना ठाऊक आहे. तरी देखील या अपयशी नेतृत्वाचा निवडणुकीत वारंवार विजय होतो. सत्योत्तर काळात सत्य व असत्य यामधील भेद नाहीसा होत नाही. उलट तो अधिकाधिक भेदकरित्या स्पष्ट होत जातो. केवळ जाणूनबुजून खोटे बोलणे सवयीचे होऊन जाते.

याउलट साहित्य हे वारंवार दाखवत राहते की संवाद शक्य नाही. भाषा अविश्वसनीय, धोकादायक आहे. एका मनाचे दुसऱ्या मनाला कळणे ही भ्रामक कल्पना आहे. किंवा भावुक गैरसमज आहे. भाषा घातपात करू शकते. भाषेपासून सावध रहा, भाषेला गृहीत धरू नका,असा संदेश त्या भाषेतील साहित्य देत असते. साहित्यानुभवातून परतलेला माणूस बदललेला असतो. तो पूर्वीचा बेसावध व निरागस उरत नाही. भाषा त्याची बटीक राहिलेली नसते. एकेकाळी पारदर्शक असलेली भाषा आता स्वतंत्र व्यक्तिमत्व धारण करते. सर्वच कला आपल्या माध्यमांना स्वातंत्र्य बहाल करतात. ज्याला चित्रं पाहता येतात त्याच्यासाठी रंग, रेषा,आकार,छाया व प्रकाश अनोळखी होऊन जातात. परिसरातील दृश्यमानता स्वायत्त होते. ती दृश्ये माणूस नवलाईने न्याहाळू लागतो. गायन व संगीत देखील नाद स्वरांबद्दल हेच करते.

आता कवितेच्या सुरुवातीलाच जर शब्द वाह्यात आहे अशी कबुली दिली की यापुढील कवितेतील शब्द निमुटपणे आपल्या अर्थांना पाठीवर घेतलेले हमाल कसे बनतील? गाड्या जागच्याजागी थांबणारच आणि मिशांची जन्मशताब्दी साजरी होणारच. एरवी सुद्धा आपण जेंव्हा थोर ऐतिहासिक पुरुषांच्या जन्मशताब्द्या साजऱ्या करतो, त्यांच्या चित्रांना किंवा छायाचित्रांना हार घालतो तेव्हा त्या माणसांना स्मरतो का त्या भरघोस मिशांना हार घालत असतो? माणूस गेल्यानंतर त्याच्या मिशाच, फोटोतल्या उरतात. आणि जन्मशताब्दी मिशांचीच होते. हे देखील शब्दशः खरे आहे. तसेही जिवंत असताना कितीतरी जण आपापल्या मिशा किंवा केसांचा कोंबडाच असतात.

या कवितेचे नाव आहे अप्रतिहत. अप्रतिहत म्हणजे सातत्य किंवा कधीही न थांबणे, कधीही पराभूत न होणे. या कवितेतील विधाने आपल्यासाठी अतिपरिचित सामाजिक व राजकीय वल्गना आहेत. दोन गोष्टींचा एकमेकांशी संबंध जोडून त्यातून भलतेच निष्कर्ष काढणे हे समाजामधील स्वतःला शहाणी समजणारी माणसे करत असतात. त्याची काही उदाहरणे कवितेत दिसतात . पुढची चारही कडवी अशा पोकळ सामाजिक शहाणीवेची उदाहरणे आहेत. देवापुढे दिवा लावणे आणि पाणी कपात होणे या अप्रतिहत गोष्टी आहेत. त्या नित्यनियमाने होतात. गाड्या नेहमीच वेळेवर सुटत नाहीत. बेरोजगारीच्या समस्येचे निराकरण कधी व्हायचे नाही. सिग्नल व्यवस्थेकडे लक्ष द्यायचे सोडून लोक खरेदीला जात राहतील, आणि आपल्या दैन्य दुःखाचे कारण देऊन लोक संस्कृतीनाशाचे समर्थन पुरवतील. या गोष्टी देखील अप्रतिहत आहेत. या होतच राहणार आणि कवितेतील (Persona) प्रवक्ता मिशा वाढवून त्यांना पीळ देतच राहणार.

या गोष्टींची रुटीन, कंटाळवाणी आणि क्षुद्र नियमितता आपल्या समाजाचा कालक्रम ठरवते. या गोष्टींना आवर घालता येत नाही. त्यामुळे पहिल्या कडव्यातील गाड्या थांबवणे ही वल्गना ठरते. अप्रतिहत या शीर्षकाला अनुसरून ही कविता उलगडली

तर ती सामाजिक कालिकतेचे( टेम्पोरॅलिटीचे) स्पष्टीकरण देते. नेहमीच होणारी पाणी कपात आणि रोज देवापुढे लावला जाणारा दिवा, उशिरा धावणाऱ्या गाड्या आणि उशिरा नोकरी मिळणारे लोक, जयंत्या जन्मशताब्द्या आणि पुण्यतिथ्या या सगळ्या नियमित घटनांमुळे समाजाला काळाची परिमिती मिळते.

समाजाला काळाचे भान येते. अप्रतिहत हे शीर्षक सुचवते तसे, काळ हाच या कवितेचा विषय आहे. जुन्या संस्कृतींचा नाश कालपटलावर होतो. जुन्या सत्ताधार्यांची संस्कृती नष्ट करून नव्या सत्ताधाऱ्यांची संस्कृती प्रचलित होते. जुन्या दुःखांचे भांडवल करून नवे सत्ताधारी आपल्या नव्या सामाजिक रचनेचे समर्थन करतात.

साहित्यामधील शब्दांचा अनावरपणा, वाह्यातपणा आणि सर्वसामान्य जीवनामधील घाणेरडे रुटीन यामध्ये सरळसरळ विरोध आहे. कवी कवितेमधील वाह्यात शब्दांनी गाड्या थांबू शकतो. स्वतःची जन्मशताब्दी साजरी करू शकतो. मिशा वाढवू शकतो आणि त्यांना पीळ देऊ शकतो. जेव्हा सर्वसामान्य माणसे खरेदीला जातात आणि जुन्या संस्कृतींचे नाश करतात, रोजगारांचा शोध घेतात पाणी कपात करतात व सहन करतात आणि देवापुढे दिवे लावतात.

कविता अप्रतिहत नसते. काळापुढे ती अगतीक होत नाही तर कविता कालातीत असते.

राहुल पुंगलिया

कवितेची साद्यंत निर्मितिप्रक्रिया ! काळाचा मुद्दा विशेष ! मतभेद म्हणजे ' आधी माहीत असणे ' -- त्याला ही कविता वाव ठेवत नाही -- हेही विवेचन विशेष ! ( राहुल पुंगलियांची पोस्ट )

कुणाकडेही दुर्लक्ष केलेले नाही. असे उदात्त वागण्याची सवलत सर्वांना सारखीच असणार, असा या पोस्टचा रोख आहे.

जगावर परिणाम करणाऱ्या १०० कादंबऱ्यांपैकी ४३ तुम्ही वाचलेल्या आहेत -- हे बेष्टच ! शक्य झाल्यास, त्यांतल्याही तुमच्या मते निवडक कादंबऱ्यांची थोडक्यात ओळख आणि काय आहे त्या त्या कादंबरीचे मोठेपण अशा पोस्ट इथे देऊ शकलात तर एक मौल्यवान काम होईल. त्याचे नंतर पुस्तकही निघावे. अर्थात तुमच्या अग्रक्रमांप्रमाणे पाहावे.

( लीना पांढरे यांच्या पोस्टवर )

प्रकाश बुद्धिसागरने दिग्दर्शित केलेल्या माझ्या ' पोत्यातून गोत्यात ' य नाटकात आत्माराम भेंडे यांनी काम केले होते. सोबत, तोडीस तोड माधव वाटवे होते ! धमाल यायची !

मराठी कवितेच्या दृष्टीने तुमची ही पोस्ट महत्त्वाची वाटते. श्रीकांत ढेरंगे यांची कविता प्रथमच वाचली ! सखोल, चिंतनशील !

( सतीश तांबे याच्या पोस्टवर )

उमाताईंचे काम तर ग्रेटच आहे पण तुम्ही लिहिलेला पहिला ' वेळ घालवण्याचा ' उताराही भारी आला आहे !

( लीना पांढरे यांच्या पोस्टवर )

बरे झाले तुम्ही सांगितलेत ! काहीजण ही दु:खाची भलावण तर समजणार नाहीत, ही भीती होतीच !□

अत्यंत ग्रेट कविता ! ( स्वप्नील चव्हाणची कविता )

अचूक रोगनिदान ! ( गिरीश पतके )

कारणे अनेक असतीलच पण एकूणात मराठीची अधोगती चालू आहे, असेच म्हणावे लागते.

अत्युत्तम आणि मराठीत वर्षानुवर्षे महत्त्वाचा ठरावा असा लेख ! तुमची अनुमती गृहीत धरून शेयर करतोय.
( लीना पांढरे )

उत्सव, सण, जयंत्या, पुण्यतिथ्या आणि अस्मिता यांच्या व्यसनी असलेल्या प्रदेशात हेच होणार !

अगदी परिपूर्ण आहे हे विवेचन ! शिवाय अलीकडे आणखी एक पद्धत पडलेली आहे -- सध्या काय चालले आहे मराठी साहित्यात -- तरुण मुले, मुली काय लिहिताहेत, वगैरे विषयांवर बोलताच कामा नये असा दंडकच दिसतो.

कोणत्याही कलेबाबत विचार करताना जसे उत्तम कला समोर ठेवून विचार केला जातो तसेच इथे उत्तम समीक्षेबाबत विचार व्हावा असे वाटते. आस्वाद हा निर्मितीरूप असल्याशिवाय नुसती वा दुसरी कुठलीही समीक्षा त्या नामाभिधानाला कमीच पडेल.

It i a very good memory with me -- your Kannad ' DHOLTASHE ' !
( मेघा हेरूर )

मराठीतून केलेली कुचेष्टा आणि द्वेष वाचणारे कमी कमी होत जातील तसतशी ही भाषा मरत जाईल ! तिचा दुसरा काही महत्त्वाचा असा फारसा उपतोग दिसत नाही !

मूल्यविचार टाळायचीच प्रवृत्ती वाढलेली आहे.

अभियांत्रिकी, रसायनशास्त्र, वाहनाची देखभाल, अशी सर्व पुस्तके ज्ञानात्मक असतील -- इथे प्रामुख्याने वाङमयीन पुस्तकांचा म्हणजे कदाचित उपयोगशून्य पुस्तकांचा विचार केला आहे. कला, तत्त्वज्ञान वगैरे. सांस्कृतिक उन्नयन असे काही असेल तर त्या प्रक्रियांची पुस्तके.

माझ्या पोस्ट च्या विरोधातलेही काही लिहितो. ते असे – अहो, तिकडे नाही का, एंड ऑफ थिअरी म्हणजे उपपत्तीचा अंत झाला ना ! काही सखोल नाही, सगळे उथळच असते, वैश्विक मूल्यबिल्य काही नसते, वगैरे ! ते एवढी वर्षे मेहनत करून तिथे पोचले –

आपण तर आपोआप तिथे पोचलेलो आहोत ! आपण जगाबरोबरच आहोत ! काही गरज नाही मूल्यविचाराची ! काही महत्त्वाचे नाहीच आहे तर कशाला डोक्याला व्यायाम ? छोड देने का !

सगळे ब्राम्हणी संस्कृतीचे अनुयायी ? ब्राह्मण असो की आणखी कुणी, जिवंत आहेत ना सगळे ? संस्कृती हा एक बंद ठोकळा नसतो -- ती प्रवाही गोष्ट असते. ब्राह्मण-ब्राम्हणेतर हा खेळ खेळत बसायची ती गोष्ट नसते.

सगळे अशा पराभूत, निराश अवस्थेत असतील तर मरू द्या मग -- काय करणार ?

मी सांगतो तेच मूल्य असा राजकीय टाइप कट्टरपणा नाही पण ज्याचे त्यानेही यावर चिंतन करायला हवे. तुम्ही एक लेखक आहात -- तुमचाही एक मूल्य विचार तुमच्या लेखनात पाझरत असतो. त्याबाबत अनेकांनी, ' समजून घेण्याच्या ' तयारीने -- आधी निष्कर्ष न काढता चर्चा करायला हवी. साहित्याचा कसदारपणा म्हटले तर कसदारपणा म्हणजे काय, असे होईल. तसेच पुढे जायला हवे. माझ्या आकलनाप्रमाणे जगण्यातल्या गुंतागुंतीचे पूर्ण भान म्हणजे मूल्यात्मकता. आता ' पूर्ण भान ' म्हणजे काय -- तर ही चर्चा खूप होऊ शकते. नुसतेच व्यक्तिगत अनुभव वा मतरूपी आकलन म्हणजे मूल्य नव्हे, असे म्हणता येईल. मूल्यशोध हा व्यक्तिगत हेतूने बांधलेला नसतो, असे म्हणता येईल.

डॉ. तिकोणे माझ्या मित्र यादीत आहेत. आम्हा निवृत्तांच्या प्रदेशात त्यांचे स्वागत आहे ! त्यांना भरपूर शुभेच्छा !

या कादंबरीचे नाट्यरूपांतर करताना कला आणि जगणे यांतल्या सखोल संबंधाची जाणीव रिच होत गेली.
( ट्रायल )

राजकीय भूमिका सापडते आहे का ते बघा, मराठीसाठी ते बरे पडेल ! ( हरिश्चंद्र थोरात )

मराठीतल्या बऱ्याच जणांना ते अवघड आहेच ना -- त्यामुळेच तर मराठी साहित्याचे डबके झालेले आहे, असे माझे आकलन आहे. यावर मी बरेच लिहिलेले आहे. पुन्हा ते सगळे इथे लिहिण्यात इंटरेस्ट नाही. त्यामुळे, ज्याचा त्याने करावा विचार, एवढेच म्हणतो. ( ह. थो. )

Avinash Kolhe प्रयोग राज्य नाट्य ला कोल्हापूरला होऊन गेला. हे नाट्यरूपांतर माझ्या वेबसाईटवर आहे.

तुम्ही राजकीय कारणांनी खुश असाल तर त्यासाठी हे काम केलेले नाही, हे सांगू इच्छितो. काफका हा लेखक असल्या ' हुशार ' गोष्टींत सापडणारा नाही. परंतु, कलाकृती कशी वाचावी, पाहावी, ही ज्याची त्याची मर्जी !

त्यासाठीच आहे ' ट्रायल ' पण इथले ' साहित्यप्रेमी ' या कृतीला त्यांच्या आवडत्या चाकोरीत बसवून समाधान पावतील, हा धोका आहेच !

**११-०३-२५.**